# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./ आयसीडी/२०२४-२५/१३७

व्यवस्थापन परिषद

**मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२४-२५ मधील**
**दिनांक १४ ऑगस्ट, २०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त**

मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२४-२५ मधील आठवी सभा बुधवार दिनांक १४ ऑगस्ट, २०२४ तसेच सौर दिनदर्शिकेनुसार २३ श्रावण, शके १९४६ रोजी सकाळी ११:०० वाजता सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली होती.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु. क्र. | माननीय सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती/ अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | प्रा. रविंद्र कुलकर्णी ( कुलगुरु) | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | प्रा. अजय भामरे (प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३ | डॉ. शेषाद्री चारी | सदस्य | अनुपस्थित |
| ४ | डॉ. अनिल कुमार सिंग (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ५ | डॉ. कविता लघाटे (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ६ | डॉ. शिवराम गर्जे | सदस्य | उपस्थित |
| ७ | श्री. संदीप सिंग | सदस्य | उपस्थित |
| ८ | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १० | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ११ | डॉ. बळीराम गायकवाड (प्रभारी कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| १२ | (सी.ए.) हर्षल वाघ (वित्त व लेखा अधिकारी ) | निमंत्रित | उपस्थित |
| १३ | डॉ. पूजा रौंदळे (संचालक, प.व.मु.मं.) | निमंत्रित | उपस्थित |

**स्वागत** : सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून मा.अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विंनती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करून सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

**श्रद्धांजली**

**फादर फ्रान्सिस दिब्रिटो**

९३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष आणि हरित वसई चळवळीचे प्रणेते सामाजिक कार्यकर्ते फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांचे दिनांक २५ जुलै,२०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते.

**डॉ. स्नेहलता देशमुख**

शीव रुग्णालयाच्या माजी अधिष्ठाता आणि मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरु डॉ. स्नेहलता देशमुख यांचे २९ जुलै,२०२४ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८५ वर्षांच्या होत्या.

**सुधा मदन**

प्रसिध्द चित्रकार सुधा मदन यांचे ०२ ऑगस्ट, २०२४ रोजी वार्धक्याने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९६ वर्षांच्या होत्या.

**परशुराम राऊत**

विद्या विकास एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक व संचालक राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारप्राप्त परशुराम महादेव राऊत यांचे ०४ ऑगस्ट,२०२४ रोजी वार्धक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८७ वर्षांचे होते.

**शोभना रानडे**

निराधार महिला आणि मुलांसाठी सेवाकार्य करणाऱ्या ज्येष्ठ समाजसेविका आणि गांधीवादी नेत्या शोभना रानडे यांचे ०४ ऑगस्ट,२०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९९ वर्षांच्या होत्या. त्यांना २०११ मध्ये पदमभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

**बुध्ददेव भट्टाचार्य**

पश्चिम  बंगालचे माजी मुख्यमंत्री आणि ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते बुध्ददेव भट्टाचार्य यांचे ०८ ऑगस्ट,२०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते.

**विजय कदम**

लोकप्रिय मराठी अभिनेते विजय कदम यांचे १० ऑगस्ट,२०२४ रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६७ वर्षांचे होते.

**विनोद बाबू माहेश्वरी**

हिंदी पत्रकारिता आणि साहित्य क्षेत्रातील महान व्यक्ती, नवभारत-नवराष्ट्र परिवाराचे मुख्य संपादक विनोद बाबू माहेश्वरी यांचे दिनांक १२ ऑगस्ट,२०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७९ वर्षांचे होते.

माननीय सर्व सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहिली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| १ | दिनांक: २५ जुलै,२०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |

| | | |
|---|---|---|
| ठराव | दिनांक: २५ जुलै,२०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले. | |
| २ | विद्यापरिषदेच्या दिनांक २८ जून, २०२४ रोजीच्या सभेमध्ये अनुक्रमे खालील बाब<br>**Faculty of Humanities**<br>क्रमांक ५.२(N) to Introduce New Programme B.A. (Honours) in Rusia / B.A. (Honours with Research) in Russian Sem I & II अन्वये पारित केलेला ठराव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. | AAMS |
| ठराव | विद्या परिषदेच्या दिनांक २८ जून, २०२४ रोजीच्या सभेमध्ये खालील बाबीवर केलेल्या शिफारशीस मान्यता देण्यात आली.<br>**Faculty of Humanities**<br>क्रमांक ५.२(N) to Introduce New Programme B.A. (Honours) in Rusia / B.A. (Honours with Research) in Russian Sem I & II | |
| ३ | आयटीएम इन्स्टिटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट या महाविद्यालयाचा स्थलांतर करण्याबाबतचा स्थानिक चौकशी समितीचा प्राप्त अहवाल व अधिष्ठाता मंडळाचा ठराव व्यवस्थापन परिषदेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येत आहे. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | आयटीएम इन्स्टिटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट या महाविद्यालयाचा स्थलांतर करण्याबाबत च्या अधिष्ठाता मंडळाच्या ठराव मान्य करण्यात आला. या महाविद्यालयाच्या (स्थलांतर) पत्त्यात बदल करण्यासाठी २५,०००/- शुल्क घेण्यात यावे व शासनास कळविण्यात यावे, असे ठरले | |
| ४ | Report of the Inquiry Committee regarding appointment of Shri Rajiv Mishra on the post of Principal Sir J.J. College of Architecture is being placed before the Management Council for consideration as per section 102(6)/ Section 105(5) and Section 104 of the Maharashtra Public Universities Act, 2016. | AAQA |
| ठराव | Management Council has resolved that the report of enquiry committee to be sent to Hon. Chancellor. | |
| ५ | महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय येथील डॉ. आरती वानखेडे यांचे रद्द केलेले प्राधिकृत करण्याबाबतचे पत्र मागे घेण्याबाबत विचारार्थ सादर. | महाविद्यालयीन शिक्षक मान्यता कक्ष |
| ठराव | महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील डॉ. आरती वानखेडे यांचे प्राधिकृत करण्याबाबत पुनर्विचारासाठी आलेल्या पत्राचा अनुषंगाने सदर बाबतीत काही एफ.आय.आर. आणि कोर्टातून निर्दोष मुक्तता अशा बाबी विचारात घेण्यात आलेल्या नाही, असे निर्देशनास आणून दिल्यामुळे सदर बाब त्रिसदस्य न्यायाधीशाच्या समितीसमोर पुन्हा पाठविण्यात यावी असा ठराव करण्यात आला. | |
| ६ | Approval for UN-GICED all new syllabus as per NEP format w.e.f. Academic year 2023-24. | GICED |
| ठराव | विद्या परिषदेच्या दिनांक १ नोव्हेंबर,२०२४ रोजीच्या सभेमध्ये खालील बाबीवर केलेल्या शिफारशीस मान्यता देण्यात आली. | |

| Sr. No. | Courses Name | Sr. No. | Courses Name |
|---|---|---|---|
| **Master Courses** | | | |
| 1 | Master of Travel and Tourism Management | 4 | M. Sc. (Paint Technology) |
| 2 | Master of Sports Management | 5 | M.A. (Event Management and Public Relation) |
| 3 | M.Sc. (Sustainable Development and Environmental Management) | 6 | M.Com. (Agri Business and Rural Management) |
| **PG Programme** | | | |
| 1 | PG Diploma in Aspects of Media, Marketing and Events | 12 | PG Diploma in Financial Technology |
| 2 | PG Diploma in Event Management and Public Relation | 13 | PG Diploma in Cyber Security |
| 3 | PG Diploma in Disaster, Fire and Industrial Safety Management | 14 | PG Diploma in Predictive Analytics |
| 4 | PG Diploma in Advertising and Media | 15 | PG Diploma in Global Financial Markets |
| 5 | PG Diploma in Information Technology | 16 | PG Diploma in Hospital Management & Health Care |
| 6 | PG Diploma in Logistic and Supply Chain Management | 17 | PG in Hospital Administration |
| 7 | PG Diploma in Custom Clearance and Freight Forwarding | 18 | PG Diploma in Business Management |
| 8 | PG Diploma in Pharma Management | 19 | PG Diploma in Management |
| 9 | PG Diploma in Mass Media and Journalism (Hindi) | 20 | PG Diploma in Practical Film Making |
| 10 | PG Diploma in Media Management (Marathi) | 21 | PG Diploma in Apprarel Merchandising |
| 11 | PG Diploma in Mass Media and Journalism (English) | 22 | PG Diploma in Social Communication Media |

**UG Programme**

| Sr. No. | Courses Name | Sr. No. | Courses Name |
|---|---|---|---|
| 1 | B.Sc. (Paint Technology) | 10 | B.A. (Multimedia Animation) |
| 2 | B.Sc. (Aeronautics) | 11 | B.A. (Multimedia Screen Writing) |
| 3 | B.Sc. (Biomedical | 12 | B.A. (Multimedia Visual |

| | | | |
|---|---|---|---|
| | Instrumentation Science) | | Effects) |
| 4 | B.A. (Advertising Communication Design) | 13 | B.A. (Multimedia Film Production & Management) |
| 5 | Bachelor of Interior Design | 14 | B.A. (Multimedia Film Art) |
| 6 | Bachelor of Sports Management | 15 | BMS (Customs Clearance, Freight Forwarding & Logistics) |
| 7 | B. Des. (Textile Designing) | 16 | BMS (Capital Markets) |
| 8 | B. Des. (Fashion Designing) | 17 | BMS (Retail Management) |
| 9 | BMS (Travel & Tourism Management) | 18 | BMS (Event Management & Public Relations) |

| | | |
|---|---|---|
| चर्चेच्या अनुषंगाने आलेली बाब | | |
| ७ | सिद्धांत प्रदीप घाणेकर या विद्यार्थ्यांचा अपघाती निधन झाले आहे. गोवा राष्ट्रीय महामार्गावर चिपळूण शहरात महामार्गलगत असलेल्या डीबीजे कॉलेजसाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून सिमेंट काँक्रीटची भिंत घालण्यात आली आहे. प्राधिकरणाकडून संरक्षक भिंत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी घातलेली भिंत मुसळधार पावसात कोसळल्याने त्या ढिगाऱ्याखाली सिद्धांत सापडला आणि त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. सदर विद्यार्थाच्या पालकांस सानुग्रह अनुदान रक्कम देण्याची विनंती आहे. | विद्यार्थी विकास विभाग |
| ठराव | व्यवस्थापन परिषदेने विद्यार्थांच्या पालकास सानुग्रह अनुदान रुपये एक लाख फक्त तात्काळ देण्यास मंजुरी दिली. | |

कुलसचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

कुलसचिव

प्र- कुलगुरू

कुलगुरू